**नियमित फौजदारी खटला क्रं. २२४/२०१५**
**शासन वि. अफरोज पठाण**
**नि.क्र. ३५ .**

**साक्षीदार क्र. १ यांचा नि.क्र. ५२ नुसार शपथेवर पुढील सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

अपराधाच्या कामी वापरले हत्यार दाखविले तर ते मी ओळखू शकतो. तो चाकू टरबूज किंवा भाजी कापण्याचा होता. मला आता जी.एम.आर क्र. २५/२०२६ मधील बटणी/खटक्याचा चाकू दाखविला. तो चाकू तो नाही. पोलिसांनी तपास कामी माझे शर्ट व पॅन्ट रक्ताने माकले असल्याने ते जप्त केले होते. माझे पिवळया रंगाचा चौकडा असलेला शर्ट होता. मला आता मद्देमालातील शर्ट दाखविला तो तोच आहे. त्याला अर्टीकल 'अ' देण्यात आला. तसेच मिल्ट्रीकलर लाईनची पॅन्ट मला दाखविली. ती तीच असून तीला अर्टीकल 'ब' देण्यात आला.

**साक्षीदार क्र. १ चा उलटतपास आरोपी तर्फे श्री. एन.एन.पटेल विधीज्ञ यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

पोलिसांनी मला कपडे मला मागीतले म्हणून मी त्यांना काढून दिले. पोलिसांनी दवाखाण्यात येवून कपडे काढून दिले. पोलिसांनी कपडे नेले तेव्हा माझा भाउ व पोलिस ऐवढेच तेथे होते. घटने नंतर चार – पाच तासानंतर पोलिसांनी कपडे माझ्याकडून नेले. पोलिस कधी आले त्याची नकी वेळ सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्टीकल 'अ' व 'ब' म्हणून जप्त असणारे कपडे माझे आहेत हे मी खोटे सांगत आहे.

फेर तपास नाही.

**नियमित फौजदारी खटला क्रं. २२४/२०१५**
**शासन वि. अफरोज पठाण**
**नि.क्र. ३५ .**

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.06.12 18:31:49 +0530

दिनांक – १२/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर.

**दाखला**

साक्षीदार यांची साक्ष हिंदी भाषेत घेण्यात आली. तिचा अनुवाद करुन मराठीत नोंदवून घेण्यात आली. साक्षीदार यांचा जबाब हिंदी सांगितला व तो मराठीत नोंदवून घेतला व तो त्यांच्या सांगण्याप्रमाणे असल्याचे हिंदीत अनुवादीत करुन सांगण्यात आले. म्हणून सदर दाखला.

श्रवणोत्तर स्वीकृत,

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2026.06.12 18:32:02 +0530

दिनांक – १२/०६/२०२६ न्यायदंडाधिकारी प्र.व.
(न्यायालय क्रं. १), उदगीर.